**<u>अत्यंत महत्वाचे</u>**

**<u>विधानमंडळ प्राथम्य</u>**

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगर पालिका
जावक क्रमांक डीपीडीसी /मआ/४९०
दिनांक:- २०/०२/२०२०

## कार्यालयीन परिपत्रक

विषय :- मा. विधानसभा / विधानपरिषद सन २०२० अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या काळात दिवसभराचे कामकाज संपेपर्यंत कार्यालय न सोडणे बाबत.

संदर्भ :- विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन दिनांक २४/०२/२०२० पासून सुरु होणार आहे. दि. १०/०२/२०२० रोजीचे पत्रक संकीर्ण - २०२०/सं.क्र. १५८/नवि २२ नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई ४०००३२.

महाराष्ट्र राज्य विधानसभा / विधानपरिषदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन दिनांक २४/०२/२०२० पासून सुरु होणार आहे. विधानसभा / विधानपरिषदेत चर्चेला घेतले जाणारे तारांकित प्रश्न / औचित्याचा मुद्दा / कपात सूचना / अर्धातास चर्चा / लक्षवेधी सूचना ई. अधिवेशनाच्या दिवसभराच्या कामकाजात कैंव्हाही उपस्थित होऊ शकतात.

अधिवेशनाच्या काळात दिवसभराचे कामकाज हे संध्याकाळी ६.०० वाजल्या नंतर देखील सुरु असते व कामकाजाच्या दरम्यान महानगरपालिकेच्या संबंधित विषयाची माहिती शासनाकडून मागणी केल्या नंतर तातडीने उपलब्ध करून द्यावी लागते अशा परिस्थितीत संबंधित खात्याचे अधिकारी कर्मचारी कार्यालयीन वेळ संपल्यानंतर कार्यालय सोडून गेल्या नंतर त्यांच्याशी संपर्क साधता येत नाही व पर्यायाने तातडीने माहिती उपलब्ध करून देता येत नाही ही अडचण दूर करण्याकरिता प्रत्येक खात्याच्या कर्मचारी वर्गाने अधिवेशनाचे दिवसभराचे कामकाज संपेपर्यंत कार्यालय न सोडणे बाबत शासनाकडून कळविण्यात आले आहे.

सबब या कार्यालयीन परिपत्रका द्वारे सर्व खातेप्रमुखांना आदेशित करण्यात येते की, सर्व खातेप्रमुखांनी अधिवेशन काळात अधिवेशनाच्या कामकाजासाठी आपल्या विभागाकडील/खात्याकडील **एक समन्वय अधिकारी** एक लिपिक टंकलेखक व एक शिपाई यांची त्वरित नेमणूक करावी आणि त्याचे नाव, मोबाईल नंबर, कार्यालयाचा ई-मेल आय डी इत्यादि आवश्यक माहिती त्वरित मुख्य अभियंता (विद्युत) तथा समन्वय अधिकारी यांना ई-मेल द्वारे skandul@punecorporation.org , dpdcud@gmail.com या मेलवर कळवावे.

तसेच सर्व खाते प्रमुख यांनी आपले कार्यालयाकडील आवक जावक बारनिशी दिनांक २४/०२/२०२० पासून अधिवेशन संपेपर्यंत सुरु ठेवावी, यासाठी सर्व खातेप्रमुखांनी विधिमंडळाचे रोजचे कामकाज संपल्याबाबत मुख्य अभियंता तथा समन्वय अधिकारी यांचे कार्यालयाकडून दूरध्वनीद्वारे (०२०-२५५०१४०७, १३७४, १३८९, १३७७,) वर दररोज खात्री करावी व त्यानंतरच कार्यालय सोडावे.

जर एकापेक्षा जास्त खात्याशी संबधित विषय असतील तर ज्या खात्याचा प्रमुख विषय असेल त्या त्या खात्यासमोर **<u>समन्वयक</u>** नमूद करून शासनाकडे पत्र पाठविण्याचे व त्या खाते प्रमुखांनी अन्य खाते प्रमुखांशी समन्वयातून उत्तरांचा मसुदा तयार करून त्यावर मा. महापालिका आयुक्त यांची स्वाक्षरी घेऊन अंतिम उत्तर मुदतीत शासनाकडे सदर करावे लागणार आहे.

जर प्राप्त झालेल्या पत्रातील विषय / प्रश्न आपल्या कार्यालयाशी संबंधित नसतील तर तसे मुख्य अभियंता विद्युत तथा समन्वय अधिकारी कार्यालयाकडे प्रत्यक्ष अथवा यांना ई-मेल द्वारे skandul@punecorporation.org , dpdcud@gmail.com या मेलवर कळवावे. तसेच भ्रमणध्वनी (९६८९९३१३७४) द्वारेही तातडीने कळवावे.

तरी सर्व खातेप्रमुखांनी अधिवेशन कालावधीत सतर्क राहून आपल्या खात्याशी विधानसभा / विधानपरिषदेचे अधिवेशनाच्या कामकाजाशी संबंधित विषयांची तातडीने पूर्तता करावी. अन्यथा संबंधित खातेप्रमुखांना जबाबदार धरले जाईल याची नोंद घ्यावी.

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत माहितीसाठी ...

१. अति. महा. आयुक्त (विशेष)
   पुणे महानगरपालिका
२. अति. महा. आयुक्त (जनरल)
   पुणे महानगरपालिका
३. अति. महा. आयुक्त (इस्टेट)
   पुणे महानगरपालिका
४. मुख्य अभियंता (विदुयत)
   तथा समन्वय अधिकारी
   पुणे महानगरपालिका

प्रति,
सर्व खातेप्रमुख,
पुणे महानगरपालिका